7.1.8 21-22

| Programmes conducted for creating an Inclusive Environment | | | |
|---|---|---|---|
| Name of the activity | Organizing unit/ agency/ collaborating agency | Date of the activity | Number of students participated in such activities |
| | **2021-2022** | | |
| Sadbhawana din | NSS | 20-08-2021 | 125 |
| Hindi Language day | Department of Hindi | 14-09-2021 | 55 |
| Dr.A.P.J.Kalam Jatyanti | Cultural department | 15-10-2021 | 45 |
| Kavi Sammelan | Cultural department | 01-01-2022 | 30 |
| Samaj Din Rally | Cultural department | 04/-02-2022 | 180 |
| Blood donation camp | NSS | 01-02-2022 | 35 |
| Marathi language day | Department of Marathi | 27-02-2022 | 60 |

Principal
Karmveer Mamasaheb Jagdale
Mahavidhyalaya Washi Ta.Washi Dist.O.bad

7.1.8

**RESPOSE** - India is a nation which has Unity in Diversity. The college takes maximum efforts to make the students united in all aspects though they hail from different culture and practices. The day begins with the morning prayer for communal peace and harmony. The prayer refreshes minds of all faculty and students. No discrimination on the basis of gender, caste, language and religion. Special cells like SC/ST are formed to monitor the discrimination if any on the basis of caste. Scholarships facility is provided to the economically weaker section of the society. Value education, Gender studies and Environmental studies are offered as compulsory courses for all the undergraduate programs which inculcate values, gender sensitization and an eco friendly approach in the students. Committee Against Sexual Harassment (CASH) to record any grievance regarding Sexual Harassment Grievance Redressal Cell for taking steps to address the grievances of the students Secretary & Principal are accessible to students and they can directly contact them to redress their grievances. Mentor Mentee system (Student Adoption Programme) to provide additional care to students. Counseling given to students to overcome problems associated to age and gender. Students are motivated to participate in various social activities such as crowd, traffic control, Swatch Bharat, voter awareness etc. These programmes instill tolerance and help them to be molded into a responsible citizen. Avenues like Yoga club, Red Ribbon club, Youth Voluntary blood donors club, Gender club, Consumer club, Nature club, etc. creates a platform to work together and kindle their feelings of Love, Kindness & Compassion towards all living beings, animal life and plant life. The festival of Diwali is celebrated in the college. The students perform rural form of dances and are dressed traditionally. The celebration of such festivals instills culture among the students. To create patriotism and love towards our Nation, Republic Day and Independence Day are celebrated where in students are made to orate the life of freedom fighters to their fellow students.

**Principal**
Karmveer Mamasaheb Jagdale
Mahavidhyalaya Washi Ta. Washi, Dist. Osmanabad

| Programmes conducted for creating an Inclusive Environment | | | |
|---|---|---|---|
| Name of the activity | Organizing unit/ agency/ collaborating agency | Date of the activity | Number of students participated in such activities |
| **2021-2022** | | | |
| | | | |
| Sadbhawana din | NSS | 20-08-2021 | 125 |
| Hindi Language day | Department of Hindi | 14-09-2021 | 55 |
| Samaj Din Rally | Cultural department | 04/-02-2022 | 180 |
| Blood donation camp | NSS | 01-02-2022 | 35 |
| Marathi language day | Department of Marathi | 27-02-2022 | 60 |

Principal
Karmveer Mamasaheb Jagdale
Mahavidhyalaya Washi Ta Washi Dist.O.bad

सकाळ

# काश्मीरसाठी मानसिकता बदलणे गरजेचे

## अधिक कदम : जगदाळे महाविद्यालयाच्या वतीने व्याख्यान

**वाशी, ता. १७ (बातमीदार)** : काश्मीरच्या मूलभूत परिवर्तनासाठी सामाजिक मानसिकता बदलणे गरजेचे आहे'', असे मत काश्मीर येथील अधिक कदम यांनी व्यक्त केले. ते येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात आयक्यूएसी व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत नॅशनल लेवल कर्मवीर ऑनलाइन व्याख्यानमालेत 'महाराष्ट्राचा पुत्र हिमालयाच्या मदतीला' या विषयावर बुधवारी (ता.१७) बोलत होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष नदंन जगदाळे होते. या मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ. रवींद्र कठारे यांनी केले. श्री. कदम म्हणाले, ''छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्त्रीप्रतिष्ठा व स्त्रीसन्मान या सिद्धांताच्या आधारावर काश्मीरमधील बदलेली सामाजिक संस्कृती बदलता येवू शकते.

स्त्रियांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणणे व सामाजिक परिवर्तनाला सुरुवात करणे हीच खरी आपली मूलभूत जबाबदारी आहे. दहशतवाद आणि हिंसा यांना शस्त्राच्या बळावर दूर करण्याचा प्रयत्न केल्यास उद्रेक होतो. याचा अनुभव आपल्याला आहे. त्यामुळे अहिंसा व त्यागावर आधारित मूलभूत सामाजिक परिवर्तन करण्यासाठी आपण तयार झाले पाहिजे'', असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी श्री नंदन जगदाळे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. एम. डी. उंदरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. आनंद करडे यांनी आभार मानले.

Aurangabad, Osmanabad-Today
18/06/2021 Page No. 2

7.1.8

# काव्यातून समाजप्रबोधन करावे

## सूर्यकांत जगदाळे : वाशी येथे जिल्हास्तरीय कवी संमेलन



लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशी :** कवींनी आपल्या काव्यातून समाजप्रबोधनाचे काम करावे. तसेच अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काव्यातून जनजागृती करावी, असे आवाहन माजी प्राचार्य डॉ. सूर्यकांत जगदाळे यांनी केले.

येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधत जिल्हास्तरीय कविसंमेलन पार पडले. याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. रुपेशकुमार जावळे तर प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र कठारे उपस्थित होते. संमेलनात जिल्हाभरातून १२ कवी व कवयित्रींनी सहभाग नोंदवित विविध विषयांवर कविता सादर केल्या. काव्यसंमेलनाची सुरुवात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्यावरील गीताने करण्यात आली.

या कार्यक्रमामध्ये डॉ. अरविंद हंगरगेकर, बाळ पाटील, अमोल माने, श्याम नवले, स्नेहलता झरकर, अश्विनी गपाट धाट, सुवर्णा शिनगारे, प्रगती साळुंके, युसूफ सय्यद, कृष्णा साळुंके यांनी विविध विषयांवर आपल्या कविता सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

सूत्रसंचालन प्रा. महादेव उंदरे यांनी केले. प्रा. श्यामसुंदर डोके यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी आयोजन समितीचे सदस्य प्रा. डॉ. बालाजी देवकते, प्रा. महेंद्रकुमार चंदनशिवे, प्रा. विश्वास चौधरी, प्रा. महादेव टिपरसे, प्रा. डॉ. संजय माळी, प्रा. अजितकुमार तिकटे, प्रा. सुनीता डोके, स्वप्निल शेलकांदे, विनायक उगलमुगले यांनी पुढाकार घेतला.

7.1.8

सकाळ

# काश्मीरसाठी मानसिकता बदलणे गरजेचे

## अधिक कदम : जगदाळे महाविद्यालयाच्या वतीने व्याख्यान

वाशी, ता. १७ (बातमीदार) : काश्मीरच्या मूलभूत परिवर्तनासाठी सामाजिक मानसिकता बदलणे गरजेचे आहे'', असे मत काश्मीर येथील अधिक कदम यांनी व्यक्त केले. ते येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात आयक्यूएसी व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत नॅशनल लेवल कर्मवीर ऑनलाइन व्याख्यानमालेत 'महाराष्ट्राचा पुत्र हिमालयाच्या मदतीला' या विषयावर बुधवारी (ता.१७) बोलत होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष नदंन जगदाळे होते. या मान्यवरांचे स्वागत प्राचार्य डॉ. रवींद्र कठारे यांनी केले. श्री. कदम म्हणाले, ''छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्त्रीप्रतिष्ठा व स्त्रीसन्मान या सिद्धांताच्या आधारावर काश्मीरमधील बदलेली सामाजिक संस्कृती बदलता येवू शकते.

स्त्रियांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणणे व सामाजिक परिवर्तनाला सुरुवात करणे हीच खरी आपली मूलभूत जबाबदारी आहे. दहशतवाद आणि हिंसा यांना शस्त्राच्या बळावर दूर करण्याचा प्रयत्न केल्यास उद्रेक होतो. याचा अनुभव आपल्याला आहे. त्यामुळे अहिंसा व त्यागावर आधारित मूलभूत सामाजिक परिवर्तन करण्यासाठी आपण तयार झाले पाहिजे'', असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी श्री नंदन जगदाळे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. एम. डी. उंदरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. आनंद करडे यांनी आभार मानले.

Aurangabad, Osmanabad-Today
18/06/2021 Page No. 2

7.1.8

# जगदाळे महाविद्यालयात 'मराठी दिन'

वाशी, पुढारी वृत्तसेवा : शहरातील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिक वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. रवींद्र कठारे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभागप्रमुख प्रा. महेंद्र चंदनशिवे, ग्रंथपाल माधव टिपरसे आणि प्राध्यापक उपस्थित होते.

प्रा. चंदनशिवे म्हणाले की, कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस आपण जागतिक मराठी भाषा दिन म्हणून साजरा करतो. वि. वा. शिरवाडकर यांचे नटसम्राट हे नाट्य विशेष गाजले तसेच त्यांच्या कविता निबंध तसेच इतर साहित्याची दखल घेऊन त्यांना ज्ञानपीठ हा साहित्यामधील सर्वोच्च पुरस्कार मिळाला.

अध्यक्षीय समारोपामध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. रवींद्र कठारे म्हणाले कि, मराठी भाषेचे महत्त्व वरचेवर वाढत आहे कारण अमेरिका ऑस्ट्रेलिया आणि सिंगापूर सारख्या देशामध्ये आठवड्यातून एक वेळा मराठी शाळा भरवली जाते.

इंग्रजी जरी ज्ञानभाषा असली तरी मराठीचा किंवा मातृभाषेचा विसर पडता कामा नये. यावेळी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन प्रभारी प्राचार्य डॉ. रवींद्र कठारे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक ग्रंथपाल टिपरसे यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. एम. डी. उंदरे यांनी केले.

आभार प्रा. डॉ अनंत पाटील यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. आर. आर जाधव, प्रा. शाम डोके, प्रा. राजाभाऊ बनसोडे, प्रा. विश्वास चौधरी, प्रा. विजयकुमार भांजे, प्रा. अजितकुमार तिकटे, प्रा. सुनील आवारे, विपूल भालेराव, अजय जाधव आणि मुकुंद कोळी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी, पालक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

21-22

7.1.8

पुरोगामी विचारांचे
लोकराज्य





# भारतभर जागरूकता व पोहच कार्यक्रमाचे उद्घाटन

Maharashtra, Washi October 02, 2021



वाशी / प्रतिनिधी-

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी, एन.सी.सी, एन.एस.एस व तालुका विधी समिती वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त्त 'भारतभर जागरूकता व पोहच कार्यक्रम' दिनांक ०२ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबर २०२१ या सप्ताहचे आयोजन करण्यात येणार आहे.  या कार्यक्रमाचे उद्घघाटन राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांना अभिवादन करून  वाशी न्यायालयाचे न्यायाधीश संजय कोळेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रविंद्र कठारे, वाशी पोलीस उपनिरीक्षक पवन निंबाळकर यांच्या हस्ते वाशी शहरातून रॅली काढून करण्यात आले. यानंतर महाविद्यालयात हा कार्यक्रम संपन्न झाला.

न्यायाधीश संजय कोळेकर यांनी सांगितले कि, नागरिकांना कायद्याचे ज्ञान माहिती असणे गरजेचे आहे, गुन्हेगारीने केल्याने स्वतःचे नाही तर आपले कुटुंब व भविष्याचे नुकसान होते. त्यामुळे प्रत्येक नागरिकांनी ठरवले पाहिजे कि आपण एक चांगला नागरिक होऊ. त्यासाठी 'भारतभर जागरूकता व पोहच कार्यक्रम'  हा हाती घेतला आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रविंद्र कठारे यांनी सांगितले कि, सत्य, अहिंसा, न्यायचा मार्ग दाखवून, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आपल्या विचारांनी मोलाचे योगदान राष्ट्रपिता महात्मा गांधींनी दिले आहे. गांधीची तत्व, विचार आणि त्यांनी दिलेली बहुमोल शिकवण त्यांच्या नावाप्रमाणेच अमर आहे. जगातील प्रत्येक पिढीला गांधीजींचे विचार प्रेरक ठरतात. त्यात गांधींचे विचार आणि त्या तत्त्वांचे अनुकरण महत्त्वाची भूमिका बजावताना दिसून येते

या कार्यक्रनाचे प्रस्ताविक डॉ.अरुण गंभीरे यांनी केले सूत्रसंचलन प्रा.विश्वास चौधरी तर आभार डॉ.आनंद करडे यांनी मानले. या कार्यक्रमाला गावातील नागरिक, वकील, पोलीस,प्राद्यापक वृंद, पत्रकार बंधू ,आशा कार्यकर्ता आदि उपस्थित होते.

6/27/24, 10:49 AM WhatsApp Image 2021-09-05 at 10.07.32 AM.jpeg

7.1.8



# जीवनात व्यक्तीला सामाजिक ध्येय असणे गरजेचे : डॉ.निलेश मोहिते

[illegible] IDAC [illegible] National Level Karmaveer Online Lecture Series [illegible]



[illegible] Online [illegible]

[illegible] Turning Point [illegible]

https://drive.google.com/drive/folders/17c-H3a1oSTH4AABkkFvgl1F4_ywGHMUb

21-22 7.1.8

उस्मानाबाद शनिवार दि.२७/११/२०२१ ८

# जगदाळे महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त कार्यक्रम



वाशी दि. २६ (प्रतिनिधी)–
कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे ७२ व्या भारतीय संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य प्रा.आर.आर जाधव तसेच प्रमुख वक्ते म्हणून हिंदी विभागप्रमुख प्रा.डॉ. अरुण गंभीरे, कार्यक्रम अधिकारी प्रा. आर.एन बनसोडे, प्रा.के.डी गुंड, प्रा.रवी चव्हाण, प्रा.डॉ. आनंद करडे आणि एन.सी.सी विभागाचे सुभेदार संतोष भोसले नायब सुभेदार दिलीप शेंडगे हवालदार दादा मोटे हवालदार मथुरा सिंग उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्तविक करताना डॉ.आनंद करडे यांनी कार्यक्रमाचा हेतू आणि भारतीय संविधान दिना विषयी माहिती सांगितली.
कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. अरुण गंभीर यांनी भारतीय संविधानाच्या मूलभूत गोष्टी सांगितल्या यावेळी सुभेदार संतोष भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले कि, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील सर्व जातीधर्मातील नागरिकांसाठी बहुमोल असे संविधान दिले. तसेच २६/११/२००८ रोजी अतिरेकी हल्यामध्ये शाहिद झालेल्या जवान आणि निरपराध नागरिकांचे स्मरण आपण केले पाहिजे. असे सांगितले.
यावेळी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन प्रा.एम. डी उंदरे यांनी केले. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्या मध्ये वीरमरण आलेल्या सर्व भारतमातेच्या वीरपुत्रांना व बळी गेलेल्या निष्पाप नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.
या कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना प्रभारी प्राचार्य प्रा.आर. आर जाधव म्हणाले कि, सर्व जाती धर्मातील नागरिक यांनी कोणत्या पद्तीने मार्गक्रमण करावे हि शिकवण संविधान आपणाला देते असे ते म्हणाले.
या कार्यक्रमाचे संचालन प्रा.एम. डी उंदरे यांनी केले.तर आभार प्रा.के डी गुंड यांनी मानले. कार्यक्रमासाठी बहुसंख्येने विध्यार्थी प्राध्यापक कर्मचारी उपथित होते.

22-23 7.1.8



वाशी येथील कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात ऑनलाइन राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धा पार पडली. स्पर्धेचा शुभारंभ सांस्कृतिक विभागाचे चेअरमन जयकुमार शितोळे यांच्या हस्ते झाला.

# राज्यस्तरीय महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेत यशकुमार मुंढे ठरला अव्वल

लोकमत न्यूज नेटवर्क

वाशी : कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात ऑनलाईन राज्यस्तरीय अंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा घेण्यात आली.

'सार्वजनिक क्षेत्रातील खासगीकरण धोरण योग्य आहे की नाही' या विषयावर घेण्यात आलेल्या स्पर्धेचे ऑनलाईन उदघाटन शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे खजिनदार व सांस्कृतिक विभागाचे चेअरमन जयकुमार शितोळे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र कठारे, संयोजक प्रा. के. वाय. जाधव हे होते.

स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या संघाव्यतिरिक्त औरंगाबाद, इचलकरंजी, लातूर, बार्शी, रेणापूर, नांदुरघाट, भूम आदी ठिकाणच्या १० संघातील २० विद्यार्थांनी सहभाग नोंदविला. प्रथम क्रमांकाचे पारितोषिक नांदुरघाट येथील कला महाविद्यालयाच्या यशकुमार अशोकराव मुंढे याने मिळवले. तर इचलकरंजी येथील नाईट कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स कॉलेजची तेजस्विनी पांचाळ हिने द्वितीय पारितोषक मिळवले. तृतीय पारितोषिक वाशी येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयाच्या आदेश शिवराम शिंदे आणि नाईट कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्सच्या अक्षय मारुती इळके यांना विभागून देण्यात आले. स्पर्धेचे सांघिक स्मृतिचिन्ह नाईट कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स कॉलेजच्या संघास मिळाले.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून विनोद गादेकर, पोपट गोसावी व श्रीधर धारकर यांनी काम पहिले. प्रास्ताविक संयोजक प्रा. के. वाय जाधव यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. महादेव उंदरे यांनी तर प्रा. भगवान राऊत यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी मंडळाचे प्रा. एम. डी उंदरे, प्रा. अजितकुमार तिकटे, प्रा. सुनील आवारे, प्रा. भगवान राऊत, डॉ. संतोष वडगणे व स्वप्निल शेलकांदे यांनी परिश्रम घेतले.

22-23 7.1.8

# जगदाळे महाविद्यालयात जिल्हास्तरीय कविसंमेलन संपन्न

तभा वृत्तसेवा

**वाशी, दि.३१ डिसेंबर -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी तेथे भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव याचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये जिल्हास्तरीय कविसंमेलन आयोजित करण्यात आले. संमेलनाचे उदघाटन म हाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सूर्यकांत जगदाळे यांनी केले तर अध्यक्ष म्हणून डॉ. रुपेशकुमार जावळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र कठारे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी जिल्हातून जवळपास १२ कवी व कवीयत्री यांनी आपल्या कवीता सादर केल्या.

काव्यसंमेलनाची सुरवात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्यावरील गीताने करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये डॉ. अरविंद हंगरगेकर, बाळ पाटील, अमोल माने, शाम नवले, स्नेहलता झरकर, अश्विनी गपाट धाट, सुवर्णा शिनगारे, प्रगती साळुंके, युसूफ सय्यद, कृष्णा साळुंके यांनी विविध विषयावर आपल्या कविता सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

सूत्रसंचलन प्रा.महादेव उंदरे यांनी तर प्रा.शामसुंदर डोके यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ बालाजी देवकते, प्रा. महेंद्रकुमार चंदनशिवे, प्रा. विश्वास चौधरी, प्रा. महादेव टिपरसें, प्रा.डॉ. संजय माळी, प्रा. अजितकुमार तिकटे, प्रा. सुनीता डोके, स्वप्निल शेलकांदे, विनायक उगलमुगले यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी प्राध्यापक वृंद कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.